७ दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा सांगली ■ बुधवार, दि. १४ ऑगस्ट २०१९ Website : janpravas.in

# नानासाहेबांचा सामाजिक सेवेचा वसा शैक्षणिक संकुलाने जपला



महाडीक संकुलाच्या पूरबाधित विद्यार्थ्यांना मदतीचा हात देताना प्राचार्य महेश जोशी समवेत विभागप्रमुख प्रा.विनोद कापसे, उपप्राचार्य प्रा.सी.बी पाटील, प्रा.शीतल गावडे, प्रा.किशोर शिंदे...

**इस्लामपूर ● प्रतिनिधी**

महाडिक कुटुंबीयांचा समाजसेवेचा आदर्श समोर ठेऊन नानासाहेब महाडिक शिक्षण संकुलाच्या वतीने महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला. महाडीक शिक्षण संकुलामध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेणाऱ्या पूरबाधित विद्यार्थ्यांच्या घरी भेट देऊन त्यांना जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. तसेच बऱ्याच विद्यार्थ्यांच्या घरामध्ये पाणी शिरले असल्यामुळे पाणी पातळी कमी झाल्यावर घर स्वच्छतेसाठीही मदत करण्यात येत आहे. जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी पूर पीडित असून त्यांना आवश्यक ती मदत करण्यात येत आहे. अनेक स्टाफ व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पूरग्रस्त विद्यार्थी व त्यांचे पालक यांना भेटण्यास गेल्यावर त्यांच्या डोळ्यातील आपलेपणाचा भाव खूप काही सांगून जातो. झालेले नुकसान भरून येणारे नाही पण महाडिक संकुलाने दिलेला मदतीचा हात व धीर आमच्यासाठी मोलाचा आहे अशी प्रतिक्रिया पालकांनी दिली. यावेळी प्राचार्य महेश जोशी, विभागप्रमुख प्रा.विनोद कापसे, उपप्राचार्य प्रा.सी.बी पाटील, प्रा.शीतल गावडे, प्रा.किशोर शिंदे, प्रा.विकास पाटील, प्रा.सुनील जांभळे, शिक्षक स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.